**मोटार अपघात दावा अर्ज १२९/२०२३**
**<u>निशाणी क्र. १४ लगत</u>**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास सा. वाले नं. ०२ करीता श्री. आर. डी. यनगंदुल वकील याचेमार्फत -</u>**

०१. माझे शिक्षण ८ वी पर्यंत झाले आहे. मी स्वत: अपघात पाहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी उमेश पुजारी यांनी अपघात पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, महेश देशमुख माझा नातेवाईक आहे. महेश देशमुख व गैरअर्जदार नं. ०१ हे एकाच तालुक्यातील आहेत. गैरअर्जदार नं. ०१ च्या गाडीचा नंबर मला पोलीसांनी सांगीतला.

०२. मी अपघाताच्या आजुबाजुचे सी. सी. टी. व्ही. पाहीले नाही. नगर- पुणे हायवे रस्ता हा रहदारीचा रस्ता आहे. त्यारस्त्यावरती स्ट्रीट लाईट नाही. महेश देशमुख यांच्या व्यतीरीक्त कोणी अपघात पाहिला किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघातानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यापुर्वी आमची चर्चा झाली. हे म्हणणे खरे नाही की, अज्ञान वाहनाने धडक दिली असताना गैरअर्जदार नं ०१ याच्याशी संगणमत करुन आम्ही खोटी केस दाखल केली आहे. पोलीसांनी वाहन जप्त केले किंवा कसे हे मला माहिती नाही. अर्जदार नं. ०३ हे शेती करतात. हे म्हणणे खरे नाही की, पतीच्या वयाबददल मी पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पतीचे वय ३० वर्षापेक्षा जास्त होते. अर्जातील पत्ता माझा बरोबर आहे. उमेश अनु पुंजारी हे सुपा येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, मयताच्या उत्पन्नाचा दाखला खोटा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयताला मासिक १२ हजार रुपये उत्पन्न मिळत होते, हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

दिनांक : १७.१२.२०२५
अहमदनगर.

( सी. एम. बागल )
सदस्य, मोटार अपघात प्राधिकरण,
अहमदनगर